पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०८

**सभावृत्तांत**

दिनांक - **०५/१२/२०१९** वेळ - **दुपारी २.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०५/१२/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव**

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**सभापती -** आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने गुरुवार दिनांक १९/१२/२०१९ रोजी दुपारी १.४५ वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(उल्हास बबनराव जगताप )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०८

**सभावृत्तांत**

(दिनांक ०५/१२/२०१९ ची तहकूब सभा)

दिनांक - **१९/१२/२०१९** वेळ - दुपारी **१.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची दिनांक ०५/१२/२०१९ ची तहकूब सभा **गुरुवार** दिनांक **१९/१२/२०१९** रोजी दुपारी **१.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.गायकवाड निर्मला मनोज
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
५. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली**

सुचक – मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक – मा.निर्मला गायकवाड

डॉ.श्रीराम लागू, ज्येष्ठ अभिनेते, यमुनाबाई ज्ञानोबा काळभोर – मा.वैशाली काळभोर, सदस्य शिक्षण समिती यांच्या सासूबाई, तसेच दिनकरराव शिंदे, सामाजिक कार्यकर्ते यांचे नुकतेच निधन झालेले असल्याने आजच्या सभेत वरील मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करुन सदर सभा सोमवार दिनांक २३/१२/२०१९ रोजी सकाळी ११.४५ वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)**

**सभापती –** सोमवार दि.२३/१२/२०१९ रोजी सकाळी ११.४५ वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. शिक्षण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ०८

**सभावृत्तांत**

(दिनांक ०५/१२/२०१९ व १९/१२/२०१९ ची तहकूब सभा)

दिनांक - २३/१२/२०१९ वेळ - सकाळी ११.४५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची दिनांक १९/१२/२०१९ ची तहकूब सभा सोमवार दिनांक २३/१२/२०१९ रोजी सकाळी ११.४५ वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. **पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.गायकवाड निर्मला मनोज
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
५. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक - ०१
दिनांक - २३/१२/२०१९ विभाग – शिक्षण (प्राथमिक)
सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.रेखा दर्शले
संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.शिक्षण/अस्था/१अ/कावि/२६२/२०१९, दि.२७/११/२०१९

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपा प्राथमिक शिक्षण विभागाच्या अस्थायी आस्थापनेवर रक्कम रुपये २,००,००,०००/-(र.रु.दोन कोटी फक्त) तरतूद उपलब्ध असल्याचे दिसुन येत आहे. त्यानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे घडयाळी तासिकेनुसार ७७ पदांच्या वेतनाचा खर्च र.रु.५८,६४,३२०/-(अंदाजे) हा अस्थायी आस्थापनेवर असणा-या तरतुदीतून खर्ची टाकण्यास तसेच प्राथमिक शिक्षण विभागासाठी घडयाळी तासिकातत्वावर सन २०१९-२० या शैक्षणिक कालावधीसाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे शिक्षक नेमणूकीबाबत (उर्दु / हिंदी / इंग्रजी माध्यमाकरिता) मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५७४/२०१९
दिनांक : २३ /१२/२०१९

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.